**उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग**
ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.
मुख्यकार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हाठाणे, महाराष्ट्र
Head Office, Ground Floor, Ulhasangar-421 003 Dist Thane, Maharashtra
Tel No:- ९५२५१-२७२०११६ /१२५ Ext. No. २३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४

जा.क्र./उमपा/करवि/यु.८/२८६/२०२३

दिनांक ०७/११/२०२३

**वाचा:-** १) विशेष नोटीस क्र. उमपा/करवि/यु.८/५७/२८६, दिनांक २९/०४/२०२३
२) श्रीम. किरण अनिल तलरेजा यांनी दि. १६/०५/२०२३ रोजी दाखल केलेली हरकत. (ना.सु.केंद्र टोकन क्र. ४१२०२३०००८९७४)
३) जा.क्र./उमपा/करवि/२८६, दि. २०/१०/२०२३ रोजीची सुनावणी नोटीस.
४) सुनावणीचा दिनांक ०७/११/२०२३

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. 57DI012039100 (सरकारी शौचालय, बॅरेक नं. १९३७ समोर, ओ. टी. सेक्शन, उल्हासनगर-५) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता कर निर्धानासंबंधी संदर्भ क्र. १ अन्वये विषेश नोटीस बजावण्यात आली आहे.

उक्त नोटीसच्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ अन्वये कर आकारणी जास्त आहे. ती मान्य नसल्यामुळे सदर मिळकतीचे क्षेत्रफळ जास्त दर्शविले आहे. ते दुरूस्त करावे. सदरील घर हे खुप वर्षापुर्वीचे जुने आहे त्यामध्ये कोत्याही प्रकारचा बदल किंवा वाढीव बांधकाम केलेले नाही. अशी हरकत दाखल केली आहे.

उक्त हरकतीच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ नुसार संबंधितास सुनावणीस उपस्थित राहणे बाबत नोटीस बजावण्यात आली आहे.

दिनांक ०७/११/२०२३ रोजी सुनावणी दरम्यान श्रीम. किरण अनिल तलरेजा हे गैरहजर असुन त्यांनी संदर्भ क्र. २ चे अर्जान्वये कर आकारणी जास्त आहे. ती मान्य नाही. मिळकतीचे क्षेत्रफळात दुरूस्ती करावी. सदरील घर हे खुप वर्षापुर्वीचे जुने आहे त्यामध्ये कोत्याही प्रकारचा बदल किंवा वाढीव बांधकाम केलेले नाही. असे निवेदन सादर केले आहे.

संदर्भित मिळकतीचे क्षेत्रफळ, वापर, बांधकाम प्रकार, विशेष नोटीसी प्रमाणे बरोबर आहे. सबब संदर्भित मिळकती करीता विशेष नोटीस नुसार निश्चित करण्यात आलेले कर योग्य मुल्य व आकारणी कायम करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 57DI012039100 (सरकारी शौचालय, बॅरेक नं. १९३७ समोर, ओ. टी. सेक्शन, उल्हासनगर-५) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता विशेष नोटीस नुसार निश्चित करण्यात आलेले करयोग्य मुल्य व आकारणी कायम करुन संबंधित मिळकतधारकास वर्ष २०२३-२०२४ करीता बिल बजावण्यात यावे.

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत,

१) मे कोल्ब्रो ग्रुप, नागपुर
२) श्रीम. किरण अनिल तलरेजा रा. सरकारी शौचालय, बॅरेक नं. १९३७ समोर, ओ. टी. सेक्शन, उल्हासनगर-५

Scanned with CamScanner